| 1 | Admission Fee | 20 | 0 | 18 | 20 | 0 |
| 2 | Tuition Fee | 216 | 240 | 216 | 240 | 300 |
| 3 | Term Fee | 36 | 40 | 36 | 40 | 50 |
| 4 | Laboratory Fee | 70 | 70 | 70 | 80 | 100 |
| 5 | College Exam. Fee | 75 | 75 | 450 | 75 | 75 |
| 6 | College Magazine | 50 | 50 | 60 | 50 | 50 |
| 7 | Student Safety Insurance | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 8 | Identity Card | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 9 | Laboratory Management Fee | | | 500 | | |
| 10 | Environmental Studies | | | 100 | | |
| 11 | Sport Fee | 50 | 50 | 120 | 50 | 50 |
| 12 | Specific Charges | 0 | 200 | 200 | 0 | 200 |
| 13 | Library Fee | | | 200 | | |
| 14 | Medical Exam. Fee | | | 20 | | |
| 15 | Garden Fee | | | 150 | | |
| 16 | Educational Activity | | | 105 | | |
| 17 | Security Guard Fee | | | 200 | | |
| 18 | Extra Curricular Activity | | | 2000 | | |
| 19 | Extension Activity | | | 300 | | |
| 20 | Development Fund | | | 700 | | |
| 21 | Student Co-op. consumer store Membership (Only for new admission) | 20 | 0 | 20 | 20 | 0 |
| 22 | Vehicle Stand and Security | | | 100 | | |
| | **Total (Rs.)** | **572** | **760** | **5600** | **610** | **860** |

Note - 1) Only Girls - Students of 11[th] and 12[th] class are eligible for Freeship, but they have to submit their affidavit to the college. S.C.,S.T.,S.B.C.Girls-students are not eligible for Freeship.
2) Students of H.S.C. Voc. course, will have to pay development fund Rs. 50/- per month



Scanned with OKEN Scanner

# FEE SCHEDULE FOR SENIOR COLLEGE

| S.No. | Item/Head | B.A., B.Com., B.Sc. | M.Sc. | M.Com. |
|---|---|---|---|---|
| 1 | Tuition Fee | 800 | 6000 | 3000 |
| 2 | Prospectus and Admission Form | 20 | 20 | 20 |
| 3 | Laboratory Fee: Arts, Commerce<br>Laboratory Fee: Science | 485<br>965 | --<br>6655 | 2665<br>-- |
| 4 | Library Fees | 160 | 1330 | 1330 |
| 5 | Game & Sports | 160 | 00 | 00 |
| 6 | Co-curricular & Extra Curricular Activities | 85 | 00 | 00 |
| 7 | College Magazine | 85 | 00 | 00 |
| 8 | Students Development Fund (SWF+SCF+EF+Insurance Fee) | 10 | 40 | 40 |
| 9 | Medical Examination | 55 | 00 | 00 |
| 10 | Physical Efficiency Test | 30 | 00 | 00 |
| 11 | Environmental Studies | 160 | 00 | 00 |
| 12 | Facilities | 85 | 805 | 805 |
| 13 | Identity Card | 35 | 35 | 35 |
| 14 | College Examination | 120 | 100 | 100 |
| 15 | Vehicle Stand | 60 | 50 | 50 |
| 16 | Security | 60 | 50 | 50 |
| 17 | Green & Smart Campus Fees | 10 | 00 | 00 |
| 18 | E-suvidha | 10 | 10 | 10 |
| 19 | Excursion / Industrial Tour /Field visit | 100 | 00 | 00 |
| 20 | Student Co-op consumer store fee | 11 | 00 | 00 |
| 21 | Development charges | 00 | 1000 | 00 |
| 22 | University Annual Fee | 85 | 85 | 85 |
| 23 | University Enrollement Fee | 120 | 120 | 120 |
| 24 | University Corpus Fund | 10 | 10 | 10 |
| 25 | University Students Devlopment Fund(SWF+SCF+EF+Insurance Fee) | 35 | 35 | 35 |
| 26 | University Sports Fee | 50 | 50 | 50 |
| 27 | Avishkar, I.U.S.M , Indradhanush, Aavhan fee | 30 | 30 | 30 |
| 28 | Sant Gadge Baba Studies Fund | 10 | 10 | 10 |
| 29 | University e-Suvidha | 10 | 10 | 10 |
| **TOTAL FOR ARTS,COMMERCE (Rs.)** | | **2891** | | **8455** |
| **TOTAL FOR SCIENCE (Rs.)** | | **3371** | **16445** | |

Note - 1) The above fees are subject to change by University / Govt. rules

2) The Students eligible for fee concession/ scholarship will have to pay the fees not reimbursed by the government.



Scanned with OKEN Scanner

## राष्ट्रीय सेवा योजना : (N.S.S.)

या योजनेत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ऐच्छिक प्रवेश घेता येईल. पण त्यामध्ये किमान उपस्थिती ७५ टक्के आवश्यक राहील. अन्यथा, त्यास प्रोत्साहनपर गुण (Incentive Marks) मिळणार नाही. राष्ट्रीय सेवा योजनेचे महाविद्यालयात विद्यार्थी व विद्यार्थीनींकरीता स्वतंत्र युनिट आहे.

## प्रोत्साहनपर गुण : (Incentive Mark)

**अमरावती विद्यापीठाच्या ऑर्डिनन्स नं.१ (१९८५) प्रमाणे एन.सी.सी.,एन.एस.एस., खेळ व क्रीडा आणि इतर कार्यक्रमात भाग घेणाऱ्या वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त १० गुण देता येतात.**

| | | |
|---|---|---|
| १. | अ) एन.एस.एस. मध्ये पूर्ण वर्ष सहभाग (१२० तास) | ५ गुण |
| | ब) एन.एस.एस. मध्ये पूर्ण वर्ष सहभाग व एक शिबिर | ६ गुण |
| | क) एन.एस.एस.मध्ये पूर्ण वर्ष सहभाग व दोन शिबिर | ७ गुण |
| २. | अ) आंतर महाविद्यालयीन खेळ व क्रीडा मध्ये सहभाग | ३ गुण (प्रत्येकी) |
| | ब) आंतर विद्यापीठ खेळ व क्रीडा मध्ये सहभाग | ५ गुण (प्रत्येकी) |
| | क) आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग (उदा. वादविवाद, नाटक इत्यादी.) | ३ गुण (प्रत्येकी) |
| | ड) आंतरविद्यापीठ सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग | ४ गुण (प्रत्येकी) |
| ३. | रक्तदान | २ गुण (प्रत्येकी) (जास्तीत जास्त ५ गुण) |
| ४. | राज्यशासनाच्या योजनेप्रमाणे माहिती गोळा करणे. | ५ गुण |
| ५. | होमगार्ड | ५ गुण |

### ※ शारीरिक शिक्षण वर्ग (वरिष्ठ महाविद्यालयासाठी)

सर्व विद्यार्थ्यांसाठी शारीरिक शिक्षण वर्ग अनिवार्य आहे. या वर्गासाठी ज्यांची उपस्थिती ७५ % पेक्षा कमी असेल त्यांना परीक्षेला बसता येणार नाही.साधारणत: फेब्रुवारी मध्ये शारीरिक क्षमता चाचणी घेतली जाईल. या परीक्षेला बसणे अनिवार्य आहे. गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही.

**※ ग्रंथालय :** महविद्यालयाचे ग्रंथालय सर्व विषयातील ग्रंथांनी समृद्ध असून दरवर्षी त्यात नवीन ग्रंथाची भर पडत असते. ग्रंथालयाचा भरपूर उपयोगघेणे व त्याचबरोबर ग्रंथालयाची नासधूस होणार नाही याची दक्षता घेणे हे प्रत्येक विद्यार्थ्याचे कर्तव्य आहे.ग्रंथालयासंबंधीचे सर्व नियम ग्रंथालयाच्या सूचनाफलकावर विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी लावलेले असतात. या नियमासंबंधीची सर्व माहिती ग्रंथपालाकडे मिळू शकेल. ठराविक मुदतीपेक्षा जास्त दिवस पुस्तक जवळ ठेवल्यास, पुस्तकाची पाने फाडली गेल्यास, ग्रंथ हरविल्यास, बी.टी. हरविल्यास दंड आकारला जाईल. ग्रंथालयाचा व वाचनालयाचा भरपूर उपयोग विद्यार्थ्यांनी करावा अशी अपेक्षा आहे. महाविद्यालयाचे वाचनालय सर्व विषयावरील मासिके, साप्ताहिके व दैनिकांनी समृद्ध आहे. तसेच ग्रंथालयामार्फत आयोजित विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा. ग्रंथालयात प्रवेश करताना ओळखपत्र असणे आवश्यक राहील.



Scanned with OKEN Scanner

* **संत तुकाराम पुस्तक पेढी योजना** : या योजनेअंतर्गत गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना दीर्घ मुदतीसाठी (पूर्ण सत्राकरीता) विषयाची क्रमिकपुस्तके (टेक्स्ट बुक) पुरविण्यात येतात. या बाबतच्या पात्रताविषयक अटी सूचना फलकावर लावल्या जातात. विद्यार्थ्यांनी त्याचा फायदा घ्यावा

* **संत नामदेव अभ्यासिका** : गरजू विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुस्तकांसह अभ्यासिका पूर्ण वेळ उपलब्ध राहील. या योजनेअंतर्गत ओळखपत्रावर कोणतेही पुस्तक अभ्यासासाठी उपलब्ध करून दिले जाते.

* **इंटरनेट** : सर्व विद्यार्थ्यांकरीता ग्रंथालयामध्ये मोफत इंटरनेट सेवा उपलब्ध आहे.

* **क्रीडांगण** : निरनिराळे खेळ खेळण्यासाठी महाविद्यालय उत्तेजन देत असते. क्रिकेट, व्हॉलीबॉल, हॉकी, खो-खो इत्यादी सर्व खेळांसाठी सोयी उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने खेळात भाग घ्यावा अशी अपेक्षा आहे. उत्कृष्ट खेळाडूंचा महाविद्यालयाकडून गौरव केला जातो.

* **विविध कार्यक्रम** : महाविद्यालयामध्ये साहित्यिकांची व्याख्याने व इतर कार्यक्रम आयोजित केले जातात. दरवर्षी बॅरि.रामराव देशमुख आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा आयोजित केली जाते. वादविवाद मंडळ, व्यवसाय मार्गदर्शन विभाग, विविध गुण विकास मंडळ, वाङ्मय मंडळातर्फे काव्य वाचन, कथा वाचन, गायन, नृत्य, नकला, चित्रकला, छायाचित्र, भरतकाम, सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा इत्यादी कार्यक्रम घेण्यात येतात. तसेच राष्ट्रीय पुरुष व थोर व्यक्तिंच्या जयंती व पुण्यतिथी दिनी त्यांच्या प्रतिमांना हारार्पण करुन श्रध्दांजली अर्पण केली जाते.

* **विद्यार्थी गुण गौरव व पुरस्कार** : ह्या योजनेअंतर्गत प्रत्येक वर्गातून विविध विषयात गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.

* **सामूहिक विद्यार्थी विमा योजना** : विद्यार्थी विमा योजना सुरु करण्यात आली असून नाममात्र हप्ता भरणाऱ्या विद्यार्थ्यांना अपघात झाल्यास त्याचा फायदा होऊ शकतो.

* **विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार** : महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ग्राहक भांडाराचा सभासद अर्ज भरणे आवश्यक राहील. महाविद्यालयात विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार सुरु असून त्यातून विद्यार्थ्यांना उपयोगी वस्तू माफक किंमतीत उपलब्ध होतात.

* **ओळखपत्र** : प्रत्येक विद्यार्थ्यांस महाविद्यालयचे ओळखपत्र देण्यात येईल. प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे. वाचनालयातील पुस्तके, मासिके व इतर सोयी ओळखपत्राच्या आधारावर दिल्या जातील. विद्यापीठ व बोर्डाच्या वार्षिक परीक्षांसाठी ओळखपत्र आवश्यक राहील. महाविद्यालयात येताना दररोज प्रत्येकाने आपले ओळखपत्र बाळगावे. त्याशिवाय महाविद्यालय परिसरात प्रवेश करु नये.

* **संशोधन सुविधा** : आचार्य पदवी (Ph.D.) मिळविण्याकरिता खालील विषया मध्ये विद्यापिठाव्दारे मान्यताप्राप्त संशोधन केंद्र व मार्गदर्शक (Guide) उपलब्ध.

**• रसायनशास्त्र • प्राणिशास्त्र • वनस्पतीशास्त्र • गणित • भौतिकशास्त्र • वाणिज्य**



Scanned with OKEN Scanner

# विविध सवलती व शिष्यवृत्ती

महाविद्यालयात पात्र विद्यार्थ्यांना खालील सवलती व शिष्यवृत्ती मिळू शकतात.

**सवलती :**

१. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी फी सवलत (राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती)

२. प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत (P.T.C.)

३. राज्य सरकार स्थानिक स्वराज्य संस्था कर्मचाऱ्यांच्या मुलांना मिळणारी फी सवलत (S.G.L.B.)

४. माध्यमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत (S.S.T.C.)

५. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना (जास्त उत्पन्नामुळे भारत सरकार शिष्यवृत्ती मिळत नसल्यास) मिळणारी फी सवलत (FREESHIP)

**शिष्यवृत्ती :**

१. गणित व फिजिक्स विषयातील नैपुण्याबाबत मिळणारी शिष्यवृत्ती (Talent Development Scholarship Maths & Physics)

२. अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी (Miniority scholarship)

३. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती (राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती)

४. स्वातंत्र्य संग्राम सैनिकांच्या मुलांना मिळणारी शिष्यवृत्ती (Scholarship to children of freedom fighters)

५. अपंग विद्यार्थ्यांना मिळणारी भारत सरकार शिष्यवृत्ती व शैक्षणिक कर्ज (Scholarship to handicapped students)

६. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी भारत सरकार शिष्यवृत्ती (G.O.I. Scholarship to Backward Class Students)

वरील व याशिवाय सवलती व शिष्यवृत्तीसंबंधीची पात्रता व अन्य माहितीबाबत कार्यालयाशी संपर्क साधावा.

**टिप: प्रवेशित विद्यार्थ्यांना उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, जातीचे प्रमाणपत्र, बँक पासबुकची छायांकीत प्रत, ई,बी,सी,अर्ज व शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालयास सादर करणे आवश्यक आहे अन्यथा त्यांना पुर्ण शैक्षणिक शुल्क भरावे लागेल.**

## विशेष पुरस्कार

1) Best Student Award – क्रीडा, सांस्कृतीक स्पर्धा, उपस्थिती व चांगल्या वर्तणुकीकरीता स्मृतिचिन्ह.

2) Best Player Award – क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यास स्मृतिचिन्ह.

3) Rs.5000/-Cash Prize – सं.गा.बा. अम. विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. ५०००/-



Scanned with OKEN Scanner

# विद्यार्थी गुणगौरव पुरस्कार

| पारितोषिकाचे नाव | पारितोषिक |
|---|---|
| १) बॅरि. रामराव देशमुख स्मृती पारितोषिक | बी.कॉम.भाग- १ मधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| २) स्व. डी.के.देशमुख (माजी सचिव, वियुवेसो, अमरावती) स्मृती पारितोषिक | बी.एस्.सी.भाग -१ मधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| ३) स्व. बाबुरावजी हिवसे (माजी कोषाध्यक्ष, वियुवेसो, अमरावती) स्मृती पारितोषिक | १२ वी कला या वर्गातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| ४) श्री. शंकररावजी काळे-सदस्य.वियुवेसो, अमरावती यांच्यातर्फे पारितोषिक | बी.कॉम भाग १ मधून इंग्रजी विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| ५) सौ. मिनल प्रमोद अट्रावलकर यांचे तर्फे विद्याधर भगवान तळेले पारितोषिक | १२ वी कला या वर्गातून इंग्रजी विषात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| ६) श्री.के.एस.गभणे यांचे तर्फे स्व.विक्रम गभणे स्मृती पारितोषिक | बी.ए.भाग -१ मधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| ७) डॉ.शुभांगी इंगोले यांचे तर्फे सौ.कल्पनाताई इंगोले पारितोषिक | बी.एस्.सी.भाग- १ मधून वनस्पतीशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थीनीस रु.१५१/- |
| ८) डॉ.जी.एस.वैराळे यांचे तर्फे शालीग्राम हरिभाऊ वैराळे स्मृती पारितोषिक | बी.ए.भाग-१ मधून इंग्रजी विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास विभागून प्रत्येकी रु.७५/- प्रमाणे |
| ९) प्रा. एन.व्ही.खरोडकर यांचे तर्फे मातोश्री देवकाबाई खरोडकर स्मृती पारितोषिक | बी.ए. भाग - १ मधून इतिहास विषात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| १०) प्रा.एस.डब्ल्यू. साठे यांचे तर्फे स्व.वामन गणेश साठे स्मृती पारितोषिक | बी.एस्.सी.भाग- १ रसायनशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| ११) प्रा.एस.डब्ल्यू. साठे यांचे तर्फे स्व.रमाबाई साठे स्मृती पारितोषिक | बी.ए.भाग- १ मधून मराठी वाङ्मय विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| १२) डॉ.एस.आर.दिघडे यांचे तर्फे स्वामी विवेकानंद पारितोषिक | बी.एस्.सी.भाग -२ मधून रसायनशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| १३) प्रा.बी.ए.नावंदर तर्फे स्वर्गीय अबीरचंद नावंदर पारितोषिक | बी.ए.भाग- २ मधून इंग्रजी विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| १४) डॉ.पी.एम.देशमुख यांचे तर्फे स्वर्गीय डॉ.एम.आर. देशमुख स्मृती पारितोषिक | बी.कॉम.भाग- २ मधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| १५) प्रा. आर.एस.सोनटक्के यांचे तर्फे स्वर्गीय पार्वतीबाई ठाकरे पारितोषिक | बी.कॉम भाग- ३ मधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| १६) डॉ.विजय मेटे यांचे तर्फे पारितोषिक | बी.एस्.सी.भाग- १ मधून गणित विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| १७) डॉ.बी.डी.देशमुख माजी प्राचार्य यांचे तर्फे स्व.दादाराव खंडेराव देशमुख पारितोषिक | बी.एस्.सी.भाग ३ मधून प्राणिशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| १८) प्रा. अशोक रुपरावजी डांगरे यांचे तर्फे स्व.डॉ.स्मिता पुंड (डांगरे) पारितोषिक | बी.एस्.सी.भाग -२ मधून वनस्पतीशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| १९) डॉ.एस.आर. दिघडे यांचे तर्फे स्व.डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख पारितोषिक | एम.एस्.सी.- भाग १ (रसायनशास्त्र) वर्गातून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.२५१/- |
| २०) कु.सुषमा देशमुख यांचे तर्फे स्व. विठ्ठलराव वामनराव देशमुख स्मृती पारितोषिक | १२ वी कला या वर्गातून इतिहास विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/ |

| पारितोषिकाचे नाव | पारितोषिक |
|---|---|
| २१) कु.सरल वानखडे यांचे तर्फे पंजाबराव नारायणराव वानखडे पारितोषिक | १२ वी कला या वर्गातून अर्थशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| २२) सौ.वृंदा रमेश जगताप यांचे तर्फे स्व.जानराव ठाकरे स्मृती पारितोषिक | बी.ए.भाग-३ या वर्गातून गृहअर्थशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थीनीस रु.२०१/- |
| २३) श्री.व्ही.एस.आखरे यांचे तर्फे स्व.श्रीरामजी देवरावजी आखरे स्मृती पारितोषिक | १२ वी कला या वर्गातून राज्यशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१०१/- |
| २४) सौ.शैलजा पी.देशपांडे यांचे तर्फे स्व.प्रभाकर देशपांडे स्मृती पारितोषिक | वर्ग १२ वी वाणिज्य मधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.२५१/- |
| २५) कु. सरल वानखडे यांचे तर्फे स्व. विठाबाई पंजाबराव वानखडे स्मृती पारितोषिक | वर्ग १२ वी वाणिज्य या वर्गातून अर्थशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१५१/- |
| २६) सौ.शैलजा पी.देशपांडे यांचे तर्फे स्व.पद्मावती प्र. देशपांडे स्मृती पारितोषिक | वर्ग १२ वी (विज्ञान) मधून गणित विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.२५१/- |
| २७) सौ.मिनल प्र.अट्रावलकर यांचे तर्फे पारितोषिक | वर्ग १२ वी (कला)मधून भूगोल विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.२५१/- |
| २८) श्री आर. टी. जैस्वाल यांचे तर्फे श्रीमती शिवराणी बद्रिप्रसाद जयस्वाल स्मृती पारितोषिक | १२ वी विज्ञान शाखेतून प्रथम येणारा विद्यार्थ्यास रु. २०१/- |
| २९) प्रा.डॉ. सुमेरसिंग ठाकुर यांचे तर्फे स्व. दर्यावसिंग सखारामसिंग ठाकुर स्मृती पारितोषिक | बी.एस्सी. भाग-३ (रसायनशास्त्र) शाखेमधून प्रथम येणारा विद्यार्थ्यास रु. २५१/- |
| ३०) प्रा. राजेश मेश्राम यांचे तर्फे स्व. पांडुरंगजी मेश्राम स्मृती पारितोषिक | बी.ए. भाग-१ मधून भूगोल विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. २५१/- |
| ३१) डॉ. एम.बी. गाथे यांचे तर्फे पारितोषिक | बी.ए. भाग-२ मधून भूगोल विषयासह प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. ५०१/- |
| ३२) डॉ. एम.बी. गाथे यांचे तर्फे पारितोषिक | बी.ए. भाग-२ मधून भूगोल विषयासह प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. ५०१/- |
| ३३) डॉ. संजय थोरात यांचे तर्फे स्व. इंदुबाई भास्करराव थोरात स्मृती पारितोषिक | बि.एस्सी. भाग ३-मधून वनस्पती शास्त्र प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. ५०१/- |
| ३४) प्रा. वामन जवंजाळ यांचे तर्फे स्व. गुलाबराव चंद्रभानजी जवंजाळ स्मृती पारितोषिक | बि.एस्सी.भाग १ मधून इंग्रजी विषयात प्रथम प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.५०१/- |
| ३५) प्रा. लक्ष्मण फुटाणे यांचे तर्फे स्व. रामरावजी फुटाणे स्मृती पारीतोषिक | वर्ग १२ वी मधून मराठी विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. १५१/- |
| ३६) प्रा. कु. एस.वाय. बदुकले यांचे तर्फे | वर्ग १२ वी मधून वस्त्रशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. २५१/- |
| ३७) डॉ. लता हिवसे यांचे तर्फे स्व. मथुराबाई हिवसे स्मृती पित्यर्थ पारितोषीक | बी.ए.भाग-२ मधून गृहअर्थशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. ५०१/- |
| ३८) निखारे परिवारातर्फे स्व. वसंत लक्ष्मणराव निखारे स्मृती प्रित्यर्थ पारितोषीक | बी.कॉम भाग ३ मधुन प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. ५०१/ |



Scanned with OKEN Scanner

# आचार संहिता

१) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या व्यवस्थेसंबंधीची माहिती प्रसिध्दि करीता देता कामा नये. अशा प्रकारात विद्यार्थी दोषी आढळल्यास त्याचेवर शिस्तभंगाची कार्यवाही होईल. विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयातील तसेच बाहेरील असभ्य वर्तणुकीची गंभीर दखल घेतली जाईल.

२) महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक कायदा क्र.३३, १५ मे १९९९ नुसार रॅगिंग घेण्यास सक्त मनाई आहे.

* विद्यार्थ्यांचे इतर विद्यार्थी / विद्यार्थीनी सोबत वर्तन सभ्यतापूर्वक असावे. विद्यार्थीनींची टिंगल व कोणतेही असभ्य वर्तन करु नये तसेच विद्यार्थी – विद्यार्थीनींची रॅगिंग घेऊन कोणत्याही प्रकारचा त्रास देऊ नये. अन्यथा, शासकीय नियमाप्रमाणे कडक कार्यवाहीस पात्र राहील.

"Ragging" means display of disorderly conduct, doing of any act which causes or is likely to cause physical or psychological harm or raise apprehensions of fear or shame or embarrassment to a student is any educational institution and includes I Teasing, abusing, threatening or play practical jokes on, or cause hurt to such student or ii) asking a student to do any act or perform something which such student will not in the ordinary course, willingly do.

* विद्यार्थी महाविद्यालयाच्या परिसरात किंवा महाविद्यालयाच्या बाहेरील इतर शैक्षणिक संस्थामध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रॅगिंग घेताना किंवा त्यामध्ये सहभाग असल्याचे आढळल्यास त्याला शासकीय नियमानुसार दोन वर्ष तुरुंगवास किंवा रु.१०,००० दंड होऊ शकतो.

* रॅगिंग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव शासकिय नियम 15th May 1999, कलम 4 नुसार महाविद्यालयाच्या पटावरुन काढून टाकण्यात येईल व त्या विद्यार्थ्याला कार्यवाहीच्या दिनांकापासून पाच वर्षेपर्यंत इतर कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश मिळणार नाही.

* अशा प्रकारात विद्यार्थी दोषी आढळल्यास त्याचेवर निलंबनाची कार्यवाही होऊ शकते.

३) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांने लगेच महाविद्यालय सोडले तर त्यांना पूर्ण सत्राचे शुल्क द्यावे लागेल.

४) विद्यार्थ्याने प्राचार्यांच्या आज्ञेचे पालन करावे, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याशी सभ्यतेने व नम्रतेने वागावे. त्यांची अवज्ञा करु नये तसे केल्यास ती गैरशिस्त समजून तो विद्यार्थी कडक कार्यवाहीस पात्र राहील. बेशिस्त, अनुपस्थिती व इतर कोणत्याही कारणावरुन विद्यार्थ्यांचे नाव महाविद्यालयाच्या पटावरुन काढून टाकण्याचा अधिकार प्राचार्यांना आहे. या बाबतीत प्राचार्यांचा निर्णय अंतिम राहील.

५) प्राचार्यांच्या परवानगीशिवाय महाविद्यालयाच्या आवारात कसल्याही प्रकारची निदर्शने, सभा किंवा इतर कोणताही कार्यक्रम घेता कामा नये. तसेच भिंतीपत्रके, प्रतिमा लावता येणार नाही. असे झाल्यास कडक कार्यवाही करण्यात येईल.

६) कोणत्याही प्रकारचे प्रमाणपत्र पूर्ण सत्राची फी भरल्याशिवाय मिळणार नाही. तसेच महाविद्यालयात प्रवेश घेतांना भरलेली फी कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.



Scanned with OKEN Scanner

७) महाविद्यालयाने दिलेले ओळखपत्र नेहमी सोबत ठेवावे. ओळखपत्राशिवाय महाविद्यालय व ग्रंथालयात प्रवेश करु नये तसेच परिसरात फिरु नये.

८) महाविद्यालयाच्या सर्व परीक्षा अनिवार्य आहेत. प्रत्येक विषयात २० टक्केपेक्षा जास्त गुण मिळविणे आवश्यक आहे. यापेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

९) प्रत्येक विद्यार्थ्याने नियमित व वक्तशीर असावे. त्याची उपस्थिती ७५ टक्के पेक्षा अधिक असावी. वैद्यकीय किंवा इतर कारणामुळे गैरहजर राहणे आवश्यक असेल तर पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. विनापरवानगी गैरहजर असणाऱ्या विद्यार्थ्यास प्रति दिवस ५ रु. (पदवी), ५० रु. (पदव्यूत्तर) दंड आकारण्यात येईल किंवा त्याचे हजेरी पटावरुन नांव कमी करण्यात येईल.

१०) महाविद्यालयाच्या प्रांगणात धुम्रपान करणे, पान खाने, तंबाखु--गुटखा किंवा अन्य अंमली पदार्थ चघळणे आणि चेहरा झाकून महाविद्याल्यात प्रवेश करणे यास सक्त मनाई आहे. अशा प्रकारात विद्यार्थी दोषी आढळल्यास त्याचेवर नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

११) महाविद्यालय परिसरात मोबाईल (भ्रमणध्वनी) सायलेंट मोडवर ठेवावा. तसेच परवानगी शिवाय मोबाईल वापरण्यास बंदी आहे. अन्यथा दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

१२) विद्यापीठ नियमानुसार प्रत्येक विद्यार्थ्याला शारीरिक क्षमता चाचणी व वैद्यकीय तपासणीसाठी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. गैरजर विद्यार्थांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

१३) गणवेश संहिता (Dress Code) : महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी गणवेश संहिता (ड्रेसकोड) लागू आहे, परंतु फारच अपरीहार्य कारणाने विद्यार्थ्यांने महाविद्यालयाचा गणवेश परिधान केला नसल्यास अशा विद्यार्थ्यांनी पॅन्ट, शर्ट, शुज, आणि विद्यार्थीनी नी सलवार, कमिज सोबत दुपट्टा, साडी या प्रकारातील (पेहराव) शिष्टाचार संमत कपडेच परिधान करणे अपेक्षित आहे. यास्तव कोणीही टी-शर्ट, जिन्स पॅन्ट, टॉप्स, अद्ययावत तंग कपडे, समारंभासाठी परिधान करावयाचे कपडे, बाहया नसलेले कपडे किंवा टोपी, गॉगल्स व अन्य बाबी कुणीही महाविद्यालय परिसरात प्रवेशित असतांना परिधान केलेले असू नये.

सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश घेतेवेळी महाविद्यालयाने निश्चित केलेल्या युनिफॉर्मसाठी विद्यार्थी ग्राहक भांडारातून कापड घेणे आवश्यक राहील.

**टिप : १) शैक्षणिक सत्र २०२२-२०२३, दिनांक १/७/२०२२ पासुन सुरु हाईल.**

**२) २०२२-२०२३ या शैक्षणिक सत्राचे शैक्षणिक नियमिका विद्यापीठाने प्रसिद्ध केल्या नंतर विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे देण्यात येईल.**



Scanned with OKEN Scanner

वर्ष दुसरे

भविष्यवेधी नेतृत्व



मा. उदयजी सामंत
कॅबिनेट मंत्री, उच्च व
तंत्र शिक्षण विभाग ,महाराष्ट्र राज्य

# महाराष्ट्र राज्य
# उच्च व तंत्र शिक्षण विभाग
# व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

यांच्या संयुक्त विद्यमाने

MITSC

# करिअर कट्टा

युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....

## आयएएस आपल्या भेटीला

- राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा/ महाराष्ट्र लोकसेवा आयोग
- पोलीस भरती
- बँकिंग सेवा
- स्टाफ सिलेक्शन कमिशन
- केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (यु पी एस सी)

## उद्योजक आपल्या भेटीला

- उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास
- व्यवस्थापकीय कौशल्य व प्रत्यक्ष उद्योजकांचे मार्गदर्शन
- वित्त व्यवस्थापन
- निर्णय क्षमता
- जोखीम व्यवस्थापन (Risk Management)
- मनुष्यबळ व साधनसामुग्री व्यवस्थापन
- आधुनिक तंत्रज्ञान

ध्येयपूर्तीच्या वाटेवर सातत्याने ३६५ दिवस

यासोबत सभासद शुल्क ₹ ३६५/-भरल्यानंतर विद्यार्थ्यांना ०३ वर्ष प्रति वर्ष ०५ या पद्धतीने १५ कोर्स मोफत दिले जातील.

नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी
7507652555 या नंबरवर आपले नाव ✆ करा
https://careerkatta.mitsc.co.in

SCAN ME




# ।। विद्यापीठ गीत ।।

विद्या चिंतन । विद्या मंथन ।
विद्या सर्जन । विद्या जीवन ।।

जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले
संत गाडगे बाबा तुमचे स्वप्न पुर्ण झाले ।।
कुणी न आता खुळे अडाणी, ज्ञानासह विज्ञान कळाले
पर्णकुटीतील प्रतिभेलाही, आभाळाचे पंख मिळाले
दशसूत्राचे अक्षर अक्षर, वेद नवा बोले ।। १ जनमन....

किती रंजले, किती गांजले, किती आंधळे लुळे पांगळे
कर्मयोग निष्काम आचरुन, कवेत घेता बांधव सगळे
भूतदयेच्या ओल्याव्याने, मानस मोहरले ।। २ जनमन....

धर्मजातीच्या पलिकडेही माणूस केवळ माणूस असतो
भेदभ्रमांचे बंध तोडूनी मानवतेचे पूजन करतो
पिढयापिढयांचे जीवन दर्शन विश्वात्मक झाले ।। ३
जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले ।।

प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ

## व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम





















Scanned with OKEN Scanner

















Scanned with OKEN Scanner

# युवा महोत्सव सहभाग व पारितोषिके





















Scanned with OKEN Scanner











Scanned with OKEN Scanner







निखिल विल्लेकर (B.A. -II)


युथ फेस्टीवल -२०२१ (द्वितीय क्रमांक)

कु. समिक्षा उपरीकर

खेलो इंडीया (बैंगलोर)

अखिल भारतीय एथलेटीक स्पर्धा (High Jump 7th Position)







सचिन नान्हे (M.Sc. Maths)

खिल भारतीय एथलेटीक स्पर्धा (मंगलोर)

स्वराज होले (M.Com.-I)

वेस्ट झोन क्रिकेट स्पर्धा (राजस्थान)

अभिनव तायडे (B.A.-I)

अखिल भारतीय एथलेटीक स्पर्धा (मंगलोर)

# खेळ व क्रिडा उपक्रम









Scanned with OKEN Scanner

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

१) रसायनशास्त्र, गणित व वाणिज्य विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम.

२) रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र व भौतिकशास्त्र प्रयोगशाळांना संशोधन प्रयोगशाळा म्हणून सं.गा.बा.अमरावती विद्यापीठाची मान्यता

३) विद्यार्थांकरीता मोफत Internet सेवा.

४) स्पर्धात्मक परीक्षेची मुबलक पुस्तके.

५) स्पर्धात्मक परीक्षांकरीता तज्ज्ञांचे मार्गदर्शन.

६) विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याकरीता Placement Cell चे आयोजन.


७) Career Counseling Cell.

८) विद्यार्थींनी करीता सर्व सोयींनी युक्त वसतिगृहाची सुविधा

९) पदवी अभ्यासक्रमा सोबतच खालील व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम करण्याची संधी

* सेरीकल्चर * ई - कॉमर्स
* संगणक उपयोजन
* वेब डिझाईन व ऑफीस ऑटोमेशन

किंमत ₹ २५/-




Scanned with OKEN Scanner